|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 29 ( ) महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या बृहत आराखडयांमध्ये आवश्यक दुरुस्त्या करुन अंतिम स्वरुप देण्यासाठी शनिवार पासून सुरु झालेल्या राज्यातील विविध विद्यापीठांच्या प्र-कुलगुरुंच्या बैठकीत आज रविवारी पाच विद्यापीठांसमवेत तज्ज्ञ समितीने संवाद साधला.

राज्यस्तरीय विद्यापीठीय पंचवार्षिक बृहत आराखडा छानननी व पूनर्तपासणी तज्ज्ञ समिती माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्यांनी रविवारी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या पाच विद्यापीठांच्या प्र-कुलगुरु, अधिष्ठाता व त्यांचे प्रतिनिधी यांनी श्री.अनिल राव, डॉ.बी.एन.जगताप, प्रा.जी.डी.यादव, श्री.आनंद मापूसकर या तज्ज्ञ समिती सदस्यांसमवेत बृहत आराखडयाविषयी चर्चा केली.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी बैठकीच्या प्रारंभी समितीचे स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील उमविचे अधिष्ठाता डॉ.डी.आर.पाटील, पुणे येथील प्र-कुलगुरु प्रा.एन.एस.उम्रानी, गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.चंद्रशेखर भुसारी, नांदेडचे प्र-कुलगुरु प्रा.जी.एन.शिंदे तसेच पुणे येथील प्रा.प्रफुल्ल पवार, प्रा.सुनील अत्रे, दत्तात्रय जंगले, गोंडवाना येथील प्रा.मनिष उत्तरवार, सोलापूर येथील प्रा.व्ही.बी.पाटील, डॉ.सु.नं.कांबळे, एस.पी.सोनकांबळे, नांदेड येथील एस.के.ए.कृष्णा, विठ्ठल चालीकवार, आर.बी.मोहरीर हे प्रतिनिधी उपस्थित होते.

---

जा.क्रः उमवि/१६/ हस्तदेय /२०१८ — दिनांक : २९ जुलै, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी